म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९७५३
१९९६७

# म
# नो
# रा

पद्मा लोकूर

REFBK-0016309
REFBK-0016309

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत
तसे न केल्यास ... पुस्तक/मासिक परत करावे,
... नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
जादा वर्ग... णी भरावी लागेल.

13 FEB 1977

[क्र. मा. प.]

काव्य
अ.नं. ४४०६०
१५/११/७०
१०५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०६० वि: काव्य
१०५३ १५/११/७०

# म
# नो
# रा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३०९

प द्मा लो कू र

मौज प्रकाशन

REFBK-0016309
REFBK-0016309

मौज प्रकाशन : १५२

पहिली आवृत्ती : १९६७

© १९६७, पद्मा लोकूर

किंमत चार रुपये

मुखपृष्ठ :
गजानन भागवत

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रम

कहाणी १
महामूर बरसात २
भिंगरी ३
कधी एकदा ४
आहे उदास आतुर ५
खेळ ६
या चक्रांतुन ८
कांही घडावेंसें वाटे ९
सफाई १०
कांहीतरीच ११
भातुकली १२
ती शक्ति १४
किंमत १५
नव्हती ती रात्र जरी १६
एकदाच १७
पहाटेच्या अभ्राखाली १८
खोल अधाऱ्या गुहेंत २०
बरेंच कांही २२
क्षितिजाच्या रेषेपाशी २३
शब्दांचें हरवलें शब्दपण २५
मनोरा २६
बर्फ-गारव्याची रात्र २७
पायरी २९
स्पर्श ३०
जन्म ३१
उतरत्या कडेवर ३३
मुकें संभाषण ३४
मंतरलेली वाट ३५
सुटलें पाउल ३६
कळी तोडण्याचे वेळीं ३७
खोल खचलेला डोह ३८
उदास पागोळ्या ३९

भारावलेली पापणी ४०
तो क्षण ४१
दव ४२
मोगरी सकाळ ४३
खरें....खोटें....४४
पुन्हा एकदा ४६
तरी ४७
फुली पडली रक्ताला ४८
पेंगुळल्या पापणीशीं ४९
कोमलेलें एक गाणें ५०
जळांत उतरे सांज कापरी ५१
दोन जिभा ५२
अलवार देणें-घेणें ५३
चोळामोळा ५४
आतषबाजी ५५
होतें मनीं ५६
पडसाद ५७
कळींतलें कळीपण ५८
ठसे ५९
मायेचा हात ६०
क्षण रडवेले ६१
थेंबें थेंबें ६२
कळलें नाही ६३
स्तब्ध ६४
गणित ६५
हटवादी ६६
रेषा ६७
शब्दाविना....स्वराविना ६८
तर ६९
असें मुलायम ऋजू ! ७०
राखेमधला फिनिक्स ७१
नकार ७२

सूर ७३
तळ नसलेला तळ ७४
कंटाळ्याचा शाप ७६
जुना संदर्भ ७७
वण ७८
असें तसें ७९
संपतांना ८१
झुला ८२

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २२ | ७ | भिनर्ते | भिनते |
| ३८ | १७ | मराणच्या | मरणाच्या |
| ४१ | १३ | कणकणाने | कणाकणाने |
| ४८ | १ | रक्ताल | रक्ताला |
| ४९ | ८ | ठिबकतां | ठिबकतो |
| ७३ | २ | आरशासारख | आरशासारखें |
| ७४ | ८ | कांही मुकें | कांही भुकें |

# ओळख

काव्याच्या जाणिवेलाच मुलभुलावणीत पाडणाऱ्या आजच्या काळात कुणाच्या कवितेची ओळख करून देणे कठीण झाले आहे. स्वतःच्या सहृदयत्वाची खात्री असली तरी आपली आवड शब्दांत सांगताना अडचण वाटते. काव्याच्या आस्वादाशी संबंधित असलेले शब्द आधीच वापरलेले. काहींनी चोखंदळपणे तर अनेकांनी वाटेल तसे. वाटेल तिथे. प्रस्तावना, परिचय, ओळख, सर्वांचे साचे बनलेले. त्यांत कोंबलेले विशेषणांच्या दडपणांनी निःशेष झालेले शब्द. हे जाणवत असता येवढेच साधे सरळपणे सांगावेसे वाटते की पद्मा लोकूर ह्यांची कविता मला आवडली. आवडत राहिली. पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटली. पण तेवढ्याने माझेही समाधान होत नाही. माझे मन विचारते का म्हणून आणि उत्तरही देते. तेच जनाला सांगायचे. मला वाटते, ह्या मूळ विचारणेतूनच समीक्षा-शास्त्राचा विकास झाला असावा.

गेल्या वीसपंचवीस वर्षांत पुन्हा मराठी काव्यसागराला भरती आली. इतके कवी इतक्या आणि इतक्या सारख्या कविता लिहू लागले की कुणा एकाची ओळख ठेवणे कठीण झाले. पण त्या कविसमूहातही चारचौघांची भावमुद्रा

आणि स्वर असा असायचा की तिथे डोळे अडकून राहावे आणि कान सावध व्हावे. त्यांच्या कवितेची आठवण राहावी आणि आतल्या काव्याची ओळख वाटत जावी. त्यांत पद्मा लोकूर हे एक नाव. कवयित्री म्हणून नव्हे. तो शब्द फसवा आहे. 'विंदा' गोविंदा आहे, 'पद्मा' पद्माकर असू शकतो. 'कवयित्री' हा शब्द मला आवडत नाही. मी वापरणार नाही. सर्जनशील कलाकाराच्या बाबतीत असे स्त्री-पुरुषभेदसूचक शब्द वापरूही नयेत. पद्मा लोकूर ह्यांची १९४६ मधली 'महामूर बरसात' ही कविता

"माझ्या अंगणांत महामूर बरसात
कशी जाऊं पावसांत ?"

ह्याऐवजी जर मी वाचले 'कसा जाऊ पावसांत ?' तर कवितेतल्या काव्यगुणांत काय फरक पडू शकेल ? का पडावा ? ह्या कवितेत 'कशी' हे एकच स्त्रीलिंगी शब्दरूप आहे. मला वाटते, कवीला कधी प्रियकर तर कधी प्रिया होता यावे. केव्हा पुरुष तर केव्हा प्रकृती.

"जो प्रियुचि प्राणेश्वरी
उलथे आवडीचिये सरोभरी
चारुस्थळीं एकाहारी
एकाअंगी"

असा कवीचा काव्यामृतानुभव असावा. पुरुष कवींनी हे केलेही आहे. केशवसुतच म्हणतात :

"होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळल्यें परोपरी
लटूपटूच्या घरदारीं
लटकीच जाहल्यें संसारीं"

ह्या पलिकडेही जर कवितेत, विशेषतः तिच्या मुक्तक प्रकारात, लिंगभेद दाखविणारी शब्दरूपेच नसली तर तो कवितेचा अधिक गुण समजावा. रसिक वाचक स्त्री,



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९६३०९
नौपाडा शाखा (ठाणे पूर्व)

असो की पुरुष, त्याला ती कविता आपलाच उद्गार आहे असे तादात्म्य जाणवले पाहिजे.

हे विषयांतर झाले. पद्मा लोकूर ह्यांची कविता मला का आवडली, काय विशेष माझ्या मनावर ठसला, कोणत्या हळुवार भावनाविष्काराचा हृदयावर संस्कार झाल्याचे जाणवले ते सांगायचे आहे. केव्हा त्यांच्या कवितेतल्या काही ओळी दाखवता येतील. कधी ह्या संग्रहातल्या सर्व कवितांच्या साकल्यात्मक भावानुभावाचा पुनःप्रत्यय घेऊन बोलावे लागेल.

पद्मा लोकूर ह्यांची एखादी किंवा चारदोन कविता वाचल्या तरी हे जाणवते की ही कविता अतिशय वैयक्तिक, स्वतःला निजगुज सांगणारी आहे. हा तिचा प्रथम परिचयात जाणवणारा एक विशेषच आहे. त्या स्वतःच्या स्वतःशी निजगुजाचा

"आभाळाची निळी शिंपली मिटून राही
लपवायाला शिकलें आहें बरेंच कांही"

असा सूक्ष्म, सूचक कोंदलेला आवाज. त्या आवाजावरून कुणी तर्क बांधतील की ही एका तरल संवेदनाक्षम स्त्रीमनाची वेदना आहे. कळतनकळत एखाद्या विसंवादी परिस्थितीत फेकल्या जावे, तीतच अडकून पडावे, आणि

"ज्याच्यासाठी हरवावें तेंच श्रेय गवसेना
कांही घडावेंसें वाटे कसें घडेना घडेना !"

अशी श्रांत जिवाची तगमग होत राहावी. तिच्या भावनात्मक जाणिवेने सहृदयाच्या मनातही त्या तगमगीचा पडसाद उमटावा, तशी ही काव्यात्मक अनुभूती आहे. पण हा फार ठोकळ आणि म्हणूनच अवास्तव समज होईल. सर्व कवितांतील भावनाविष्काराची साकल्यात्मक ओळख करून घेतली तर जाणवते की हे जिवाचे जिवाआतल्या जिवाशी बोलणे आहे. एक जीव आपल्याच जिवीच्या जिवाला आपली सुखदुःखे सांगत आहे. कधी कढ अनावर होऊन, केव्हा मन वितळून जाऊन. पण

“तुझ्या मौनाच्या डोहाशीं
डोळे थेंब थेंब झाले!”

“डोळ्यांच्याही पैलपार
दृष्टी दुजी आसवांची”

अशा सदा सूक्ष्म सूचक शब्दांत. ही ‘अवंद्याची भाषा’ समजली म्हणजे त्या संवादातले रहस्य जाणवते. वाटू लागते की हा कुणा एकाचा जीव बोलत नाही, तर स्त्री असो वा पुरुष असो, कुणाचाही जीव इथे बोलका होतो आहे. जीवनाच्या बंधनातली जिवाची विवशता, विकलता, विफलता सांगतो आहे.

हे सूत्र ध्यानात घेऊन पद्मा लोकूर ह्यांची कविता वाचली म्हणजे आशय-अभिव्यक्तीचे कितीतरी अतिहळुवार छटांचे मणी त्यात ओवलेले दिसतात. पद्मा लोकूर म्हणतात :

“फक्त कहाणी आहे ठाउक
उतट दाटल्या काळोखास”

पण ती कहाणी ऐकून त्या काळोखात कंपाच्या लहरी उत्पन्न होतात. आणि त्या लहरींचे पुन्हा शब्द होतात. ते सांगतात,

“एक सुराच्या या गाण्याला
तार स्वरांची किनार नाही,
भोवळ नाही, गिरकी नाही,
कडवट कुठला विखार नाही”

पण ह्या ‘नाही’चीच तर व्यथा आहे. गाणे एकसुरी नाही पण होऊ पाहाते ही विकलता.

“शब्द शिवून टाकले तरी
सूर आहे हाकारीत!”

ही जाणीव आणि “शब्दाविना, स्वराविना दिवस फरफटणारे” अशी टोचणी. यात पुन्हा सामाजिक जीवनाची मानीव आचारसंहिता पाळावीच लागते.



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ....................
......................... नों. दि ....................

अगदी कुठेही तोल न जाऊ देता पाळलीही जाते. तितकी कुशलतेची 'सफाई' आहेच. मधूनच आतला जीव श्वासात ओळख देत राहातो. मग

"असे मुलायम ऋजू सारें भोवती दाटतें
तरी आतलें आतलें काही आटतें आटतें :
तुझ्या विमुक्त ओढीने सारें सारें पिसाटतें !"

अशा शब्दांत त्या टोचणीची वेदना व्यक्त होते. तिलाही

"उत्कटाला मिळालेला कंटाळ्याचा शाप"

आहे.

"पानगळ लागलेली दोन्ही गालांवर :
झालें नाही असें कांही; जांभईच एक"

असा.

हे पुष्कळ वाढविता येईल आणि त्यातूनच पद्मा लोकूर ह्यांच्या कविता मला का आवडतात हे दाखविता येईल. खरे म्हटले तर त्यांच्या एकदोन कवितांचे पूर्ण विवेचन करून त्यांतले काव्य काय आहे हे दाखवायला पाहिजे. ज्याला ते जाणवते असा सहृदय ते करीलही.

कविता एकसंध असली तरी तिला अंतरंग आणि बहिरंग असते. भावनामय आशय हे कवितेचे अंतरंग. अभिव्यक्त होताना त्या आशयाने स्वाभाविकपणे आणि अपरिहार्यपणे घेतलेला, त्याला प्राप्त झालेला, शब्दरूपाकार हे बहिरंग. तोच कवितेचा बंध. म्हणजे बांधणी, फॉर्म अथवा बंदीश. बंदीश हा शब्द बांधणी-सारखाच. बंधपासून झालेला. आशय आणि बंध एकजीव असतात. विवेचनाच्या सोयीसाठी त्यांना वेगळे पाहायचे. एऱ्हवी नाही. हे विचारसूत्र प्रमाण मानून मी पद्मा लोकूर ह्यांच्या कवितेचा विचार करणार आहे.

ज्या कवितेत ती लिहिणाराची स्वतःची खास अशी उत्कट अनुभूती आणि तिला पूर्णपणे जुळणारी स्वतःची खास शब्दयोजना असते, ती माझे मन ओढून घेते. मला आवडते. तो लेखक कवी आहे आणि त्याच्या कवितेत काव्य आहे

हे मला एकदम पटते. पद्मा लोकूर ह्यांच्या कवितेतल्या अनुभूतीत आणि त्यांच्या शब्दकळेत असा खासपणा, 'खासीयत' आहे, म्हणून त्यांची कविता मला आवडली. त्यातले काव्य जाणवले. मला वाटते, येवढे सांगणे पुरे आहे. आधी काव्य म्हणजे काय ह्याची व्याख्या करून नंतर तिला जुळते म्हणून हे काव्य, असा खटाटोप करण्याची इथे आवश्यकता नाही.

शब्द हे काव्याचे व्यापारद्रव्य. पण इतरांनी वापरलेल्या शब्दांच्या नाण्यांनी ह्या व्यापाराला तेजी येत नाही. शब्दांवर स्वतःचे छाप मारून त्यांचे एक नवे चलन बनवावे लागते. अभिव्यक्तीचे स्वतःच्या अनुभूतीशी इमान राखले तर असे शब्दाचे नवे चलन आपोआपच उत्पन्न होते. पद्मा लोकूर ह्यांच्या कवितेत हे चांगले दिसते. चिकाच्या पडद्यातून जितके दिसावे तितके दाखवणारी पण आतल्या आकर्षक प्रतिमेची जाणीव करून देणारी त्यांची शब्दयोजना असते. ह्या संग्रहातल्या पहिल्या कवितेतल्या "उतट दाटल्या काळोखास"पासून ही सुरुवात आहे.

"गूढ सावली जरा सरकली"

"फिका पडसाद"

"झिंग आणली या शब्दाने,
काळेंबेरें त्यांतून दिसे"

"नजरेच्या मधांतली मधमाशी"

"झपाटून टाकूं का रे
झाड काजळी शापाने?"

"हिरवी आशा"

"ओठांतल्या दवामधे
मऊ झालासे अंधार"

"श्वास कापूस कापूस गात्रांवर वेढलेला"

"भारलेली भुरी हवा"

"मोगरी सकाळ"

"रिक्त हातीं पिंजलेलीं लाख शून्यें"

"कोमट सहानुभूतीचा झुला"

ही त्या शब्दकळेची आणखी काही दर्शने. प्रांजळपणे पद्मा लोकूर म्हणतात,

"शब्दावरती शब्द निरर्थक
असा मनोरा रचतें आहे.
या शब्दाचा त्या शब्दाशी
चिरा सांधुनी घेतें आहे."

त्या सांधण्यातच तर काव्यकला आहे. शब्दांच्या आतषबाजीत नाही. कवितेत शब्दांची उधळपट्टी नाही आणि विशेषणांची खैरातही नाही. अगदी मोजक्या शब्दात पुष्कळ सांगितले जाते. पद्मा लोकूर ह्यांच्या कवितांत अशी अल्पाक्षर रमणीयता आहे. "कळले नाही" ही चार ओळींची कविता पाहावी. उर्दूतला एखादा उत्तम शेर असावा तशी त्या कवितेची आटीव पण अतिसूचक रचना आहे.

कुणा कवीची इतकी ओळख करून देऊ नये की रसिकाला ती वाढविण्याला अवसरच मिळू नये. जागाच राहू नये. ह्या कवितेतल्या प्रतिमांविषयी बोलता येईल. पण त्या शब्दकळेशी इतक्या निगडित आहेत की पुन्हा शब्दयोजनेकडे जावे लागेल. काव्य ही प्रतिमांच्या साहाय्याने केलेली अभिव्यक्ती असते हे जाणत्या वाचकांना आता सांगायला नको. त्यांना त्या प्रतिमा दिसतात, समजतात, त्यांतले नाविन्यही जाणवते. म्हणून उगीच विस्तार नको.

मला पद्मा लोकूर ह्यांच्या कवितेची माझी ओळख सांगायची होती. समीक्षण किंवा विवेचन करायचे नव्हते. इतर समकालीनांशी तुलना, आणि तीही कवयित्रींशी, करण्याचा प्रयत्न मी करणार नाही. माझ्या दृष्टीने तर इतकेच सांगणे पुरे आहे—त्यात सर्व आले—पद्मा लोकूर खऱ्या अर्थाने 'कवी' आहेत.

—अ नि ल

म नो रा

…ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०२० वि: काव्य
क्रमांक १८०५३ नों दि १५।११।८०

## कहाणी

किती मुलामे
किती मुखवटे....
दिवसभराचा
हा इतिहास :

फक्त कहाणी
आहे ठाउक
उतट दाटल्या
काळोखास.

१५·१·५९

दा. क. १६३०९

## महामूर बरसात

माझ्या अंगणांत महामूर बरसात :
कशी जाऊं पावसांत ?
आला सडसडा : अवकाश व्यापियला
चिंब पाखरांचा मेळा
झडते सारखी सर उंबरठ्यावर
थेंब माझ्या माथ्यावर
चोरटा रोमांच उठे माझ्या अंतरांत
आणि अंगीं बरसात.

२४·११·४६

## भिंगरी

तेव्हा म्हणालास मला
    'डोळे भिंगरीसारखे':
पालवले हृदयाचे
    कळे शेंदरीसारखे.

हाडामांसाच्या देहाला
    चढे अमृताची कळा,
तुझा सूर स्पर्शतांच
    केला मोकळा मीं गळा.

कशी नकळत झाली
    मग जाणीव धुक्याची
आणि मर्यादा कळली
    थंड सत्य-असत्याची.

कुठे बिलोरी भिंगरी
    किती शोधते सारखी....
आता माझ्याच भोवती
    चाले माझीच गिरकी.

२३.८.५५

## कधी एकदा

कधी एकदा पहाटवेळीं
पानें होतीं दहिवरलेलीं
अंगें होतीं शहारलेलीं
तुझी नि माझी दिठी भेटली
तरिही हृदयें नच गहिवरलीं
कधी एकदा पहाटवेळीं....

कधी एकदा दुपारवेळीं
धुंद शांतता, थंड सावली
विडा लागला कंठाखाली
ओझरता तव स्पर्श कपोलीं
ताठर, कणखर मनें न लवलीं
कधी एकदा दुपारवेळीं....

कधी एकदा कातरवेळीं
फिक्कट गाणीं हवेंत विरलीं
गूढ सावली जरा सरकली
आठव आला चोरपावलीं
तनूमनें अपुलीं विरघळलीं
कधी एकदा कातरवेळीं....

११.७.५५

## आहे उदास आतुर

आहे उदास आतुर नभ मळभ आलेलें
स्तब्धपणांत अबोध, आहे पाणी स्थिरावलें
पारंब्यांच्या धाग्यांमागे पट आकाशाचा आहे
एक पांखरू लयींत संथ तरंगत राहे

निळ्यासावळ्या तृणांत गाणें वाहतें मातीचें
दूर अंधुकशी वाट दार पुढे अज्ञाताचें
गूढ घुंगुरमाळांचा येई फिका पडसाद
आज माझिया जिवाचा माझ्या मनाशीं संवाद

कांही अंधुक धूसर झोपलेलें कोषामधे
आज जागें होऊं पाही, हालचाल खोलामधे
चोरखणांत नाजूक कांही जाणवतें आहे
जाणवतां जाणवतां कांही हारवतें आहे

माझी वाट चुकलेली : मी न येथली येथली
मला साद ऐकूं येई आहें जेथली, तेथली

८.१०.५६

## कधी एकदा

कधी एकदा पहाटवेळीं
पानें होतीं दहिवरलेलीं
अंगें होतीं शहारलेलीं
तुझी नि माझी दिठी भेटली
तरिही हृदयें नच गहिवरलीं
कधी एकदा पहाटवेळीं....

कधी एकदा दुपारवेळीं
धुंद शांतता, थंड सावली
विडा लागला कंठाखाली
ओझरता तव स्पर्श कपोलीं
ताठर, कणखर मनें न लवलीं
कधी एकदा दुपारवेळीं....

कधी एकदा कातरवेळीं
फिक्कट गाणीं हवेंत विरलीं
गूढ सावली जरा सरकली
आठव आला चोरपावलीं
तनूमनें अपुलीं विरघळलीं
कधी एकदा कातरवेळीं....

११.७.५५

## आहे उदास आतुर

आहे उदास आतुर नभ मळभ आलेलें
स्तब्धपणांत अबोध, आहे पाणी स्थिरावलें
पारंब्यांच्या धाग्यांमागे पट आकाशाचा आहे
एक पांखरू लयींत संथ तरंगत राहे

निळ्यासावळ्या तृणांत गाणें वाहतें मातीचें
दूर अंधुकशी वाट दार पुढे अज्ञाताचें
गूढ घुंगुरमाळांचा येई फिका पडसाद
आज माझिया जिवाचा माझ्या मनाशीं संवाद

कांही अंधुक धूसर झोपलेलें कोषामधे
आज जागें होऊं पाही, हालचाल खोलामधे
चोरखणांत नाजूक कांही जाणवतें आहे
जाणवतां जाणवतां कांही हारवतें आहे

माझी वाट चुकलेली : मी न येथली येथली
मला साद ऐकूं येई आहें जेथली, तेथली

८.१०.५६

# खेळ

खेळत बसलें मी शब्दांशीं
याचा त्याचा दुवा जोडला
कधी जोडतां कधी तोडतां
खेळ जिवाला हा आवडला.

सूचक, संयत शब्द किती हा,
वेग भयंकर त्या शब्दाचा,
तो तिकडे कुणि तिरपा उलटा,
हा इकडे अन् अभिलाषेचा,

झोकदार हा कसा बहाद्दर,
मरगळलेली मुद्रा त्याची,
नाजुक झिरमिळ यास शोभते,
गोंडस मुद्रा ती पलिकडची,

झिंग आणली या शब्दाने,
काळेंबेरें त्यांतून दिसे,
हा येथे कुणि फिक्कट विटका,
तेथे रेशिम अन् निळसरसें.

खेळ चालला अनिर्बंध हा :
पानांवरती चिताडलेलें
या पानावर त्या पानावर
कांही आहे लपुन राहिलें.

बघतां बघतां शब्दांमधुनी
भस्मासुर हा कुठला उठला ?
जळून ही शब्दांची नगरी
शब्द तुझा अन् केवळ उरला.

८.१२.५६

## या चक्रांतुन

या चक्रांतुन त्या चक्रावर
ससेहोलपट अशी चालली,
या यंत्राच्या पात्यांवरती
ही अवघी मलमल विरघळली.

क्षण जाणारा जातो आहे,
येणारा क्षण येतो आहे :
जाणाऱ्याचा येणाऱ्याचा
एक मुखवटा दिसतो आहे :

एक सुराच्या या गाण्याला
तार स्वरांची किनार नाही,
भोवळ नाही, गिरकी नाही,
कडवट कुठला विखार नाही.

१२.८.५७

## कांही घडावेंसें वाटे

कांही घडावेंसें वाटे कसें घडेना घडेना?
मन जडावेंसें वाटे कोठे जडेना जडेना.

वाऱ्यापरी उधळावें, धुंद दिशांत सुटावें,
ज्याच्यासाठी हरवावें तेंच श्रेय गवसेना :
कांही घडावेंसें वाटे कसें घडेना घडेना?

दाटलेल्या जोगियाला तान स्वरांची फुटावी,
फुलें रहस्याला यावीं, शब्द परंतु मिळेना :
कांही घडावेंसें वाटे कसें घडेना घडेना?

वाट आंसवांना द्यावी परी जीव कां झरेना?
कांही घडावेंसें वाटे कसें घडेना घडेना?

२४.९.५७

## सफाई

बसण्यांत बोलण्यांत आहे नितळ सफाई,
हवापाण्याच्या गप्पांत आहे सफेत धुलाई,
'आभारां'ची, 'कृपये'ची होते उदंड खैरात.
कुठे कुठे खूण नाही कांही घडलें सैराट.

केव्हा हाताच्या कंपाने कप लवंडत नाही,
इस्त्री केल्या आदबीचा काठ दुमडत नाही,
—कधी नकळत मात्र भासतसे वेगळेंच:
नासिकेच्या स्पंदनांत कांही जाणवे उगाच!

१६.४.५८

## कांहीतरीच

‘कांहीतरी’ वाटलेलें ‘कांहीतरी’च राहूं दे
कांही सूक्ष्म तरळलें, नेणिवेंत तें वाहूं दे

आज बोलतां तुटक शब्द फिके फिके झाले
नजरेच्या मधांतली मधमाशी मी जहालें

दृष्टीआडच्या पाण्यांत कांही होतें जरा ओलें
अचानक मनामधे कांहीतरी जागें झालें

माझ्या निष्ठेचा कलश जरा कलता जाहला
वाटे ‘नातिचरामि’ला तुझ्या तडा उमटला

पंख शब्दांचे नकोत ‘कांहीतरी’ला मिळाया
अशी अधुरी रहावी ‘कांहीतरी’ची किमया

७.७.५८

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४४०२० वि: ७३।०४
क्रमांक ९८५३ नों: दि: [illegible]

## भातुकली

भातुकली ही खेळायाची
आहे जन्मावेरी :
स्वप्नामधल्या छाया हलती
धुक्यांतल्या संसारीं....

कोपऱ्यामधे उतरंडीचा
थाट मांडला आहे,
भातुकलीच्या कळशीचा पण
काठ भंगला आहे;

चिमणीच्या दाताने पेढा
तोडुन अर्धा खावा,
चट्टामट्टा उरलेल्याचा
उष्ट्यानेच करावा,

लुटूपुटीचा: राजा आणिक
लुटूपुटीची राणी,
भातुकलीच्या डोहामध्ये
उदंड वाहे पाणी....

खर्चवेच या भातुकलीचा
अजून लिहिणें आहे,
पुढील जन्मीं भातुकलीचा
हिशेब देणें आहे.

८.८.५८

राठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... दि: ....................
क्रमांक .......................... नोंद दि ..................

## ती शक्ति

ती झुगारण्याची शक्ति
तो रक्तांतिल आवेग

तें तांडव धमन्यांमधलें
अन् सर्वंकष ती आग

यांमध्ये विरघळलेली
ही अनोळखीशी कोण ?

क्षण केव्हा ओळख पटते
क्षण पडतो प्रश्न अजून !

२९.८.५८

## किंमत

किंमत या गाण्याची
दिधलेली पाण्याने
किंमत ती देतांना
पिळवटलें सर्व जिणें
रक्त फुटे अर्थाचें
शब्दांच्या जखमेंतुन,
झुरतें आकाश निळें
अवघडल्या ओळींतुन,
पाण्याची, रक्ताची
ही हळवी किंमत; पण
देतांना चढलेलें
जगण्याला नवजीवन.

३·८·५८

## नव्हती ती रात्र जरी

नव्हती ती रात्र जरी
चंद्र फिका डोइवरी;
श्वासांच्या गंधांतच
मिटलेली एक परी.

बकुळांची शय्या ही
चांदण्यांत भिजलेली,
स्पर्शांतुन प्राणांतुन
रातराणि फुललेली.

लहर एक वाऱ्याची
अंगांतुन थरथरली :
जाईचीं लाख फुलें
ओठांतुन टपटपलीं....

गंधित या मातीतुन
सूर फुटे दर्दभरी;
नव्हती ती रात्र जरी
झुरलें आकाश तरी....

१०.९.५८

## एकदाच

पेटवून देऊं का रे
माती कापुरासारखी ?
एकदाच होऊं का रे
माझी मलाच पारखी ?

डंखवून घेऊं का रे
सर्प सहस्र विषारी ?
जीवघेण्या आवर्तांत
करूं देहाची भिंगरी ?

झपाटून टाकूं का रे
झाड काजळी शापाने ?
पट उलटून टाकूं
एका बेभान डावाने ?

आरसपानी काचेचें हें
जिणें झुगारून देऊं ?
एकदाच....एकदाच
तुझी होऊनिया पाहूं ?

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
४४०८० ... दि:
१७५३ ... नों: दि:

१०.९.५८

## पहाटेच्या अभ्राखाली

पहाटेच्या अभ्राखाली
पंखपंख जागे झाले :
जाणिवेच्या नेणिवेच्या
पैलतीरीं प्राण गेले.

पीस वाऱ्याचें सुगंधी
तरळलें हळुवार;
भिजलेल्या मातीवर
गूढ वेदनेचा भार;

अंधारींच्या अंधारांत
फिक्की छटा प्रकाशाची
श्वास घेतात जपून
पानें पेंगलीं झाडाचीं;

सारें कोषांत धुक्याच्या
मूक पडलें निवांत;
आभाळाला अर्धी जाग
तरी माती शांत शांत

जाणिवेच्या नेणिवेच्या
पैलतीरीं प्राण जरी
प्राणामधे जागें आहे
फिकें फिकें कांहीतरी....

७.१०.५८

## खोल अंधाऱ्या गुहेंत

खोल अंधाऱ्या गुहेंत
 थिटा अहंकार झाला,
पापपुण्य-'मी'पणाचा
 दिवा काजळून गेला,

उपेक्षेच्या खंतीचेंही
 टोक बोथट जहालें,
भय-लज्जेचें जहर
 एका घोटांत घोटलें,

तरी तुझ्या शिडामधे
 आहे वारा भरलेला,
पाषाणाच्या निश्चयाचें
 बळ तुझ्या दिमतीला.

दुवा दुवा तोडण्याची
 आणि नवा जोडण्याची
तुला अवगत आहे
 कला फासेपारध्याची.

कांही देतां, कांही घेतां
माझी मात्र मोडतोड :
चिरा जुन्याचा कोसळे,
नव्याचीहि नाही जोड.

तोडवतां तुटेनात
खोल रुतलेल्या मुळ्या :
वेल कोसळली तरी
सुकेनात मुक्या कळ्या.

९.१०.५८

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 98309

## बरेंच कांही

आभाळाची निळी शिंपली मिटून राही :
लपवायाला शिकलें आहें बरेंच कांही.

थरथरणाऱ्या खोल जळाची निगूढ भाषा :
फटीफटीतुन फुटणारी ती हिरवी आशा.

नजरेमधली चकमक आणिक ओढ दुधारीं
शब्दामागिल कंपन, भिनतें जें जिव्हारीं....

लपवायाला शिकलें आहें बरेंच कांही
तरी मनोरा कलंडायचा थांबत नाही.

उमलत आहे अजून इच्छा मरगळलेली :
ओली आहे अजून माती करपविलेली.

११.१०.५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ४४०६० दि:
संक्र ९८५३ नों: दि: ३५।११।८०
काव्य

## क्षितिजाच्या रेषेपाशी

क्षितिजाच्या रेषेपाशी
एक रात्र थांबलेली....

धुक्यांतल्या त्या रात्रीला
मंद श्वासाची किनार,
ओठांतल्या दवामधे
मऊ झालासे अंधार....

शब्द बर्फ झाले तरी
स्पर्शालाहि भाषा फुटे,
रात्र झाली फिकी फिकी
पाकळ्यांत पाणी दाटे....

काळ्याकुरळ्या जाळीचा
कोष पहाटेभोवती,
कापराचे क्षण चार
दोन उजळल्या ज्योती....

उदंड या यात्रेतली
रात्र अशी, अर्धीपिशी
अजाणतां बिलगावी
चार मूक पापण्यांशी....

क्षितिजाच्या रेषेपाशी
एक रात्र थांबलेली....

३१·१२·५८

## शब्दांचें हरवलें शब्दपण

शब्दांचें हरवलें शब्दपण
तेही जेव्हा झाले परके :
कसून पिळला ताण जिवाचा,
रंग फिकुटले हलके हलके....

मखमालीवर निबरपणाचें
शेवाळें मग दाटुन आलें :
झाकळलेल्या डोळ्यांनाही
धूर्तपणाचे हिशेब कळले.

फूलपाखरें गळून पडलीं
निवडुंगाच्या तीक्ष्ण फडावर.
मख्खपणाचें सावट जमलें
अर्थसघनशा नेत्रकडांवर.

भोगतळाशीं संज्ञा बुडते
रक्त तरीही गोठत नाही :
सात थरांच्या मातीखाली
कसें लवलवे हिरवें कांही!

४.१२.५८

## मनोरा

शब्दांवरती शब्द निरर्थक
असा मनोरा रचतें आहे.
या शब्दाचा त्या शब्दाशी
चिरा सांधुनी घेतें आहे.

तुझ्याभोवती झिळमिळणारा
तुझा 'तूं'पणा जरा धरावा,
अर्थाच्या फसव्या पाऱ्याचा
तुझ्याभोवती कोष विणावा....

लुळीपांगळी परंतु ओंजळ:
कशी धरावी मी जलराशी?
शब्दमनोरा डोहीं बुडतो
उरतें 'तूं'पण तरी तळाशी!

२३.९.५९

## बर्फ-गारव्याची रात्र

जीवघेण्या वेदनेची
रात्र बर्फ-गारव्याची :
गोठलेल्या पापणीशी
कळी मिटली ओठांची.

काळ्या डोहीं बुडालेली
रात्र काठावर आली :
मूढ नसांच्या प्रवाहीं
धार रक्ताची थांबली.

उष्ण इच्छेची दुलई
किती सुखाचा निवारा
श्वास कापूस कापूस
गात्रांवर वेढलेला.

काळ्या स्वप्नांची अंगाई
सारे रक्तकण प्याले :
भुलभुलावणीमध्ये
कशी मीच रात्र झालें !

गूढ घूत्कार कापरा
दूरावर घुमे मात्र :
जीवघेण्या वेदनेची
बर्फ-गारव्याची रात्र !

३१·१·५९

## पायरी

खोल त्या जलाशयांत
एक थेंब मी निळा,
गूढ त्या सुरावलींत
एक सूर सावळा,

कळ्याकळ्यांत त्या उदंड
मीहि एक पाकळी,
प्रकाश-तेज दीप्तरूप
मीच मीच सावली.

दीपमाळ गगनधुंद
हीच पायरी पुरे;
तुझ्या निळावतींत एक
मूक पाखरू फिरे !

७.३.५९

## स्पर्श

ओल्या मातींतून आला
एक दबता निःश्वास
ओळखीचा....ओळखीचा :
गतजन्मींचा सुवास.

रंग-गंध-आकारांची
मनीं गजबज उठे;
कशीं मिटलीं मुठींत
मुकीं शब्दहीन बोटें.

गळे पाकळी पाकळी :
तळीं केशराचे तुरे;
तुझा स्पर्श कापराचा
इथे उरे तिथे उरे!

१८.३.५९

## जन्म

खूण तुझी कळायला
घेतला मीं जन्म नवा;
माझ्या दिव्यावर दिवा
तुझा लावायला हवा....

जन्म नवा....जन्म नवा :
फिटे पापाचीहि रास,
जाणिवेच्या भोवतीचा
तुटे पुण्यहीन फास.

ताण लागल्यावाचून
ओढ आता सुगंधाची,
पीळ पडल्यावाचून
कळ आहे आसवांची.

तुझ्या रागरागिणीच्या
एकएक तारेवर
कशीं जिवाचीं पाखरें
टेकतील हळूवार !

खूण तुझी कळायला
घेतला मीं जन्म नवा
माझा जन्म....तुझा जन्म
भारलेली भुरी हवा!

६.४.५९

## उतरत्या कडेवर

उतरत्या कडेवर
रात्र कोरड्या ओठांची,
शून्य आंधळ्या बोटांनी
गुंता चाचपडण्याची....

उतरत्या कडेवर
रक्तकण उलटले,
पर्व पालटल्यावरी
इच्छाहीन डोळे झाले....

उतरत्या कडेवर
नाही देठांचा आधार,
ऐन निळ्या भरारींत
पंख झाले दावेदार....

उतरत्या कडेवर
जग होतें तसें झालें,
कां हें पापणीच्या काठीं
पाणी माहेराला आलें ?

२२·४·५९

## मुकें संभाषण

किती काळ गोठणार
ओठीं मुकें संभाषण ?
शब्द शब्द धुमसावे
राखेखाली झाकळून !

अर्थहीन आवेगांत
चिंब रांगा अक्षरांच्या;
डंखणारें तिरपेंहि
उभें दारांत ओठांच्या !

कधी आसवांच्या ओळी
झोंबतात अक्षराला;
शब्द कुरवाळणारे :
नीज येते जाणिवेला !

मुक्या संभाषणाकाठीं
नभ प्रश्नांचें वाकलें;
तुझ्या मौनाच्या डोहाशीं
डोळे थेंब थेंब झाले !

१०.७.५९

## मंतरलेली वाट

मंतरलेली वाट आणखी ती स्वप्नांची हवा,
बोटांमध्ये बोटें झिळमिळ : शहारला गारवा;
छायेच्या जाळीने धरलें सावट अंगावरी,
भुरभुरणाऱ्या श्वासांचीं मग कर्णफुलें जाहलीं;
केसांच्या वलयांना कळली शब्दहीन भाषा,
नीज न येतां डोळे गेले स्वप्नांच्या देशा;
नजरेच्या पाण्यांत तरळली स्वप्नांची गाथा,
चहुबाजूच्या कधीच होत्या मिटलेल्या वाटा;
किती पावलें चोरचोरलीं मार्ग तरी संपला,
थरथरणाऱ्या ओठावरती एक थेंब गोठला;
नसानसांतुन फुटला तेव्हा लाखलाख काजवा,
हळूच मिटला मिणमिणणारा चंद्राचाही दिवा!

१९.७.५९

## सुटलें पाउल

सुटलें पाउल मातीवरुनी,
ढगांत बुडुनी गेलें मीपण;
रंध्रांनाही नवा उमाळा,
वृत्ती देई उधळुन ढापण.

श्वासामधल्या जलद लयींची
लाटेवरती लाट सुगंधी :
पिंजुन गेल्या सुक्या क्षणांना
हवीच होती कोमट धुंदी.

हरवुन जावें अशा क्षणाला
बुडून नाही डोळे गेले;
उशागतीला खुणा पेरुनी
मूकपणें नभ दूर जहालें.

२४.७.५९

## कळी तोडण्याचे वेळीं

कळी तोडण्याचे वेळीं केलें फूल फुंकरीने,
दव निपटावें तेव्हा हळू झाकलें ओठाने,
बिंब खोडावें त्यावेळी लक्ष दर्पण दाविले,
व्यथामूळ भोळे डोळे कसे झाकळून गेले !

हळूहळू नकळत कलंडून गेलें मन :
वेध थेट तळीं घेतां, व्यथा आली तरंगून.
काळ्या वादळाचा चरा खोडतांना कापे ओठ,
नख लावितांना आता तटतटे प्राण-देठ !

झपाटल्या पापणीची गर्द नीज फिकटेना,
खोदलेल्या शिल्पांतली एक रेघ पुसटेना !

२२.८.५९

## खोल खचलेला डोह

खोल खचलेला डोह,
पाणी काळवंडलेलें,
वर भयाची सावली :
झाड झाड झपाटलें.

किर रानीं वाघळांचे
पंख फडफडतात,
जरा वाजला पाचोळा
धडधडे आत आत.

तिन्ही अंगाने घेरतो
गिळणारा हा अंधार,
शून्य निर्वात पोकळी,
दरी विक्राळ समोर.

काळ्या भीतीने थरारे
जाळ दूर उठणारा :
माझा जीव झुरूमुरू
मराणच्या आधी मेला !

२५.८.५९.

## उदास पागोळ्या

उदास पागोळ्या
टपटप थेंब :
उमटे पुसटे
कसलेंसें बिंब.

दूरांत फिक्कट
थरथरे सूर :
सुरांत मिसळे
कांहीसें बेसूर.

गवत-पानांत
गोठलेली ओल;
फुलांच्या गर्भांत
एक चरा खोल !

२३.९.५९

## भारावलेली पापणी

भारावलेली पापणी
तरी नीज न ये डोळा :
पापणीच्या दारवंठीं
भास सारे झाले गोळा.

डोळियांनी बघूं नये
असें प्राणामधे खोल :
मिटलेल्या कळीचेंही
कधी कधी होतें फूल !

२३.९.५९

## तो क्षण

अस्तित्वाच्या कणाकणांनी गोठुन जावें
शून्य एकटी अशी पोकळी विफलपणाची,
हाडांचीही पिंजण व्हावी रक्त गोठुनी
उभी तुझ्या दारांत सावली अशा क्षणांची.

थंड करंटी घुसमटलेली गर्द काजळी,
सुनेपणाचें भूत बैसलें मानेवरती,
करकरणाऱ्या रात्रीमधलें स्पर्शशून्यपण,
अपयश ठेवी वांझपणाची माती हातीं.

वीज जहालें—सोबत होण्या अशा क्षणाला,
मेघबावरी धांवत सुटलें तुझिया पाठीं
तोंच बैसला गच्च फास हा प्राणाभवती :
कणकणाने गिळून टाकी काळी माती !

९.१०.५९

## दव

किती ठिपक्यावरती
दव जडवावें तरी :
गोंदतांना सांडतात
नाना रंग, नाना परी.

बावरल्या चिमणीचें
नाक आलें चिमटींत;
दोन हात गिळणारे,
कापणारे दहा देठ....

मानेवर गुदगुली :
नख लागे मांजरीचें;
लक्ष कळे उद्धं आले
तळ्याच्या डहाळीचे.

१९.१०.५९

## मोगरी सकाळ

डोळ्याहून पाखराच्या ताजी मोगरी सकाळ

इवलीशी खूण नाही अंधाराची दुखावल्या
सैरभैर इच्छेच्याही पानावर नाही थेंब
ऊन स्वच्छ आरशाचें इथेंतिथें कलंडलें
न्हातींधुतीं दिशाबिंबें लाजुनिया चूर चूर
जळाकाठीं गर्भवती वाकली डहाळ

डोळ्याहून पाखराच्या ताजी मोगरी सकाळ

९.११.५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०८० वि: काव्य
क्रमांक १८५३ नों: दि: ९५।११।८०

## खरें....खोटें....

क्षीण क्षीण काजव्याचा
क्षण दव-ओलसर,
सीमेच्याही ऐलपैल
खोल पाणी काळेंभोर.

खरें-खोटें....खोटें-खरें
सारें कसें सारवलें:
मूढ हात चाचपती
स्पर्श स्पर्श कालवले.

डोळ्यांच्याही पैलपार
दृष्टी दुजी आसवांची;
गालीं तटतट रेषा:
अग्रें कोठल्या बोटांचीं?

नभ-मुकें चिंबपण
भरतीचें सुकतीचें....
घटभार रिते झाले
कासावीस निःश्वासांचे.

थरथर शब्द-सुनी :
अर्थ धावे कुठे कुठे !
माझें तुझें....तुझें माझें
काय खरें....काय खोटें ?

१६·१०.५९

## पुन्हा एकदा

पुन्हा एकदा वाकला अनावर मेघ :
रुख्यासुख्या ओठांवर दव-चिंब रेघ.

उलटली लाट पुन्हा पाय मागे ओढी :
दुखावल्या पाकळीला कळ पुरे थोडी.

स्तब्ध दिशा....बोलावत्या कुठे कुठे रेषा :
जाणवते पुसटते अवंढ्याची भाषा.

पापणीच्या घटाकाशी तुंबलेलें धुकें;
गवसल्या फटींतून पान फुटे मुकें.

अवकाश जरा फक्त पेटण्या कापूर;
कधीचाच ढासळतो काठ चूर चूर!

२१·१२·५९

## तरी

दुभंगले रक्त-बुंद,
हेतू चालला सुकून :
नाडी धावते अजून.

इच्छाहीन आकाशांत
पंख मोडले मुळांत
तरी पक्षी झेप घेत.

ओठावर कडू बोच,
थंड रंध्रांतल्या लाटा :
तरी तोच मुखवटा.

कलंडला अर्थ तरी
शब्द उमटाया हवा :
हळूहळू विझे दिवा!

१५.१.६०

## फुली पडली रक्ताल

पापणीला दाट अभ्रा
आणि शब्द झिलईचा,
फिका आहे नाही असा
कोन कोरड्या ओठांचा.

शिंप-कवच गर्भांत
खुळा पाझरतो थेंब :
इथे तिथे दाटू यावें
तरी वांझोटेंच बिंब.

मेंदीभऱ्या तुझ्या खुणा :
गुलाबकावली फुलें
उमटतां अंध रंध्रीं
डोळेपण घरीं आलें.

डोळेपण शब्दां आलें
तरी काठ भरतीला;
तापत्रय विखाराची
फुली पडली रक्ताला !

१८.२.६०

## पेंगुळत्या पापणीशीं

पेंगुळत्या पापणीशीं
अंधाराची तगमग,
भुरी काजव्यांची रांग :
कुठे असशील सांग?

अंतशून्य वांझ वाट
पायापाशी झुळझुळे;
ठिबकतां थेंब एक
येईल का तुझी हाक?

दुखावल्या काळोखांत
डोळां काजळ साकळे;
नाही देठ आधाराला :
सांग कसें पाहूं तुला?

रात्र दाटे गळाभर,
क्षण रक्त टिपणारा;
भास तुंबे काठोकाठ :
येशील का पाठोपाठ?

२३.२.६०

## कोमलेलें एक गाणें

त्या क्षणाची धार होती भोवळीची
आणि बाधा मर्मगाभा वेढणारी;
'तूं मला अन् मी तुला' हें पुष्पलेणें
पांघरावें सर्व अंगीं....सांगणारी.

त्या क्षणींची सावली तैशीच गेली....
आंबलेली चूळ कां ही वांझ ओठीं?
रिक्त हातीं पिंजलेलीं लाख शून्यें....
फक्त गाणें कोमलेलें एक गाठीं!

२३·४·६०

## जळांत उतरे सांज कापरी

जळांत उतरे सांज कापरी :
फिक्कटलेला सारा नूर;
जराहि होतां स्पर्श नखाचा
आकाशाचा फुटेल ऊर.

वेग थबकला रिंगणांतला :
शिलिपत गर्दी ठिपक्यांची;
चित्रामधलें जाणें-येणें :
रेघ गोठली भाषेची.

डोळ्यामध्ये थेंब दाटला :
रिक्त पोकळी तर्काची
आयुष्याचा नेम चुकावा
अशींच वळणें अश्रूंचीं.

गळून पडल्या सर्व साखळ्या :
विचित्र किमया क्षणभरची;
हवीहवीशी हवा दुधाची :
कुठे प्रतिष्ठा काचेची?

ग्रंथालय
क्र. ९६३०९
शाखा (स्थळ प्रत)
३१.५.६०

## दोन जिभा

दोन जिभांनी बोलतां
ओठ पांगळे जहाले:
नाही सोसवत आता,
उन्मळून डोळे आले.

माथा टेकण्याची जागा
तेथे फाटा फुटलेला;
आंसवांनी ओघळावें
दाट अभ्रा साचलेला.

अनावर ओसंडावें
असें किती पाहिलेलें:
कसे तिथेही भोवरे
तसूतसू पेरलेले!

बोलवत्या दोन जिभा:
नाही दिशा नाही वाट....
कुणी नाही लांबवर,
कुणी नाही पाठोपाठ!

१२·६·६०

## अलवार देणें-घेणें

अलवार देणें-घेणें
मऊ केसर-पराग;
नकळत पापण्यांचीं
टोकें स्पर्शणारी जाग.

फांदी फांदी हालवून
खुडतांना क्षणपुष्पें
स्वप्न लिलीच्या देठांचें
उरींपोटीं जळे....संपे.

१.६.६०

## चोळामोळा

भंगतांना बघूं नये
दव काळवंडलेलें;
विरतांना बघूं नये
धुकें गढूळ झालेलें;

पान ओघळूं येतांना
कळूं नये देठांनाही;
स्पर्श उडून जातांना
कळ नको बोटांनाही;

गंध-कोष उलतांना
पापणींत थेंब गोळा:
गळूं लागल्या फुलांत
जीव झाला चोळामोळा!

२५.७.६०

## आतषबाजी

असें व्यथेच्या पार बुडावें
आणि भिनावें मर्माच्याही
मर्मि; बनावें व्यथाच आपण
विश्वबुडीच्या खोल प्रवाहीं—

हें न दिलें बळ : काळोखाच्या
छटाछटांनी माखायाचें
आणि तृषेच्या शून्यपणाचीं
गूढ दालनें लंघायाचें

इतुकें केवळ. परतायाचें
आवेगाच्या काठापासुन,
आतषबाजी शब्दपणाची
केवळ आता या ओठांतुन !

४-२-६१

## होतें मनीं

होतें मनीं
माझें मला मींच कोंडायाचें
थेंबथेंब
धमनीचें रक्त पिळायाचें
आपणच
आपल्याला देऊनियां शाप
कापरांत
वितळावें कसें आपोआप
तसूतसू
आवळावा धाग्याविना फास
चूरचूर
होण्याआधी तडकावी काच

होऊनियां
सर्प जिव्हा डंखली तुलाच
पिळियलें
कोंडियलें असें मला मींच !

३·३·६१

## पडसाद

माझ्यामधे तुझे
लाख पडसाद :
आत कोंडलेले
भारलेले शब्द.

आकाशाचें बिंब
पडावें घटांत
तेवढीही साक्ष
नुरते सुरांत.

तुझे कवडसे
प्रकाशाच्या वाटा :
मुजोर कोंबाला
सले मात्र काटा.

१७·३·६१

## कळीतलें कळीपण

कळीतलें कळीपण
क्षीण झाल्यावर
गंधांतलें गंधपण
पुसूं आल्यावर
दाटेल का सांज अशी
तुंब गळाभर?
भिजवील तळरान
थेंबें थेंबें सर?
फुटेल का स्पर्शकळी
रिक्त फांदीवर?
भरतील काय डोळे
असे डोळाभर?

१७.३.६१

## ठसे

इथले, तिथले, कुठले कुठले
कोठे गेले सर्व ठसे ?
कळसावरुनी ऊन उतरतां
क्षणांत होतें भुइसरसें....
पाझरणारा ओघ अचानक
होतो थेंबसुना जेव्हा
झाकळलेल्या कडेकपाऱ्या
दुणावुनी उठती तेव्हा....
तळीं उतरतां लाटेवरुनी
भकासवाणा दीनपणा,
सांधायाची दुबळी ईर्षा
शब्दांमधला शून्यपणा....
गडद क्षणांवर अनोळखीचें
मळभ कसें इतुकें दाटे ?
कळ हारपतां शब्दांआंतिल
हुंकारांना शब्द कुठे ?

भासामधला श्वास ?....कशा नच
श्वासखुणा वाऱ्यावरती ?
काय गळोनी पानें जातां
देठाचेही वण नुरती ?

१६·६·६१

## मायेचा हात

विझून गेली ओठांवरची थरथर-इच्छा,
पुसून गेल्या स्पर्शखुणाही बोटांमधुनी :
लाट सरकली संथपणाने गवतावरुनी !

फिकट जाहला शब्दांमधला भूलभुलैय्या,
पैलपार ही डोळ्यांमधली आर्जव-भाषा :
गढूळ, बोथट स्वप्नांमधल्या निळसर रेषा !

होलपाटुनी तळास नेई असलें वादळ
नसानसांच्या गुंतवळाचें....शांत निवांत;
एकच लेणें : पाठीवर मायेचा हात !

४·७·६१

## क्षण रडवेले

नव्हतें ना तसें कांही
हरवावें असें ?
आकांताने पाखडावे
प्राण असे तसे ?

कोसळावें मुळांतून
आगळ्या दुखींत
नव्हतेंच काय तसें
आर्त, अकल्पित ?

उजेडाने वेढलेलें
फटक-पांढरें
पडलेलें ऊन, सारें
सारें टिपणारें :

अधू डोळ्यांचेंच काय
चेटूक सगळें ?
बोटामधे अडलेलें
क्षण रडवेले.

२७·३·६२

## थेंबें थेंबें

थेंबें थेंबें तळें आटे
डहुळावें कसें कोण ?
युगें काठ तुंबतांना
कोसळता पुरे क्षण....

जिद्द दुभंग होण्याची
दुभंगते कशी केव्हा :
सान गवती फुलांची
मान निवरते तेव्हा !

किती किती मापलेली
रुंदीलांबी क्षणार्धांची;
जरा हालतांच पारा
कळे उष्णता बोटांची !

अशा खुणा वेचण्याचा
अर्थ संपलेला तरी
दुखे अकालींच मेघ
आणि सरीवर सरी !

९.५.६२

## कळलें नाही

कळ येतां झरत राहील इतकें केवळ समजलें होतें :
सुकून निबरठाक होईल हें कसें कळलें नव्हतें ?
उमगलें होतें, आवाजाचे विरून जातील पडसाद सारे :
उचंबळही येणार नाही हें कसें कळलें नाही ?

३.९.६२

## स्तब्ध

भुरभुर वाटा वाळूमधल्या
इथे, तिथे, मागे, पुढे;
शहाळ्याच्या सायीऐशी
लाट फुटे, खोल बुडे.

परीघ सारा झाकळलेला,
मधेच कोठे नाव अडे;
लांब लांब ठिपका कोठे
जरा हले, पुन्हा दडे.

गर्दी असून झोपलेली,
सारवलेलें वर आकाश;
निखळ पापण्या जाग्या तरी
क्वचित् कोठे जरा प्रकाश.

तुडुंबशा भरल्या क्षणीं
असंभवाचे सूर जागे;
पायाखाली भुरभुर वाळू:
शब्द शोधीत स्तब्ध दोघें !

३.९.६२

## गणित

वय वाढतां वाढतां सुधारलें गणितही :
ताळेबंद खर्चवेच, प्रमादांना जागा नाही.
जसें द्यावें तसें घ्यावें असा व्यवहार चोख :
स्वप्नांमधे केली तरी सर्व देवघेव रोख.
असें सांधतांना सारें काय किती कामीं आलें,
किती निखळले दुवे, वाऱ्यावर काय गेलें ?
मोजदाद करूं जातां गेलें भरून आकाश :
जरी सुधारे गणित, हरवला तुझा स्पर्श !

१०.९.६२

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: काव्य
क्रमांक ........ नों: दि:

## हटवादी

ढगाआड दडण्याइतकें दूर कांहीच गेलें नाही,
जागेपणीं फिकें तरी डोळे झाकतां हटलें नाही,
बोटामधून सुटलें तरी झालें नाही स्पर्शातीत,
शब्द शिवून टाकले तरी
सूर आहे हाकारीत !

१०.९.६२

## रेषा

नकळत फुटतात केव्हा पंख पाखराला
होतां ओझरता स्पर्श तटतटणारा ओला;
दिशांच्याही पलीकडे दूर झुगारला सूर
....कदाचित् विसरलेला....आज तुंब भरे ऊर.
कधी भरू नये असे रिते केले नाही डोळे,
कधी फुलूं नव्हे असे नव्हतेच सुके कळे;
नुकत्याच हारवल्या स्वप्नावाणी अंधूकशा
तळहातावर हळू उमटल्या तुझ्या रेषा.

१८·१·६३

## शब्दाविना....स्वराविना

शब्दाविना, स्वराविना दिवस फरफटणारे,
ओरबाडणारे, जखमा रसाळ फुंकून सुकविणारे....
शिवून घट्ट ओठ जावेत असेंच होतें कांही,
कानांतही दडे बसावे असलें चेटूक होई :
तरीहि शब्द झनझनत राहील असें वाटलें होतें,
स्वराविना दिवसामागून रात्र आता जाते....

५.३.६३

## तर

स्पर्श तुझा झाला तर
पुन्हा उठेल तोच स्वर,
तींच वलयें, त्याच लाटा,
मंतरलेल्या पायवाटा
तशीच सारी भूलभुलाई,
अनवटांतील गूढ नवाई,
तुंब भरून येईल ऊर :
त्यांत भिजेल एकच सूर....
हरवलेल्या स्वप्नावाणी
कानावरती येतील गाणीं,
जवळ कांही गेलें राहून
तेंही आता जाईल वाहून,
हलकें बनून धुक्याहून
घरदार जाईल उडून !

१-८-६३

## असें मुलायम ऋजू !

उपचार-सौजन्याने दृष्टी लिंपून टाकली,
शब्दशब्द मुरडून भाषा हळूवार केली,
आर्जवाने स्वरांतली धार वेढून घेतली.

चटपटीत वेषांत आणि रेशमी कोषांत
होते चर्चा कवीमधी मोजक्याच आवेशांत :
सारे आखलेले मार्ग ठोक, ठरीव अंशांत.

दिवसाचा शोष भिजे लिंबूपाणी-केशरांत,
झगझगीत प्रकाशीं रात्र माखते मधांत,
निरोपाचे वेळीं येई स्मित छापील ओठांत.

असें मुलायम ऋजू सारें भोवती दाटतें
तरी आतलें आतलें काही आटतें आटतें :
तुझ्या विमुक्त ओढीने सारें सारें पिसाटतें !

३·८·६४

## राखेमधला फिनिक्स

खाक होऊन जातात त्यांची
राख तरी पाठीं :
हळू अंगार विझत जातात
त्यांची वाटे खंती.

'राखेमधला फिनिक्स'-प्रतिमा
जळून गेल्यांसाठी :
विझून मरगळलेल्यांसाठी
शब्द कोठे गाठीं ?

८.८.६४

## नकार

हा अनंत प्रवास : शिदोरींत सर्व नकार :
अनुल्लंघ्य....अनामिक....निरुद्देश....निराकार.
चढलेल्या कैफालाही अटळ येथे पानगळ,
मंतरलेल्या सुस्वरांना हळूहळू मरगळ.
बोचूं नये, खुपूं नये होत जाती शल्यें अशीं,
गेला तडा त्याची खूण दिसे कशीबशी.
फरफट जगण्याची चाललेली आहे तरी
घुमटाच्या खाली याच आहेस तूं कुठेतरी !

१५·८·६४

## सूर

आरशासारख नितळ ऊन,
डोळ्याहुनीही निळी हवा,
गंधालाही हिरवी डूब,
मातीला पण रंग नवा.

विवश होऊन सारे थेंब
कलंडलेले पानांवर,
पानापानाआड कळी,
धुंदी होई अनावर.

निर्मल धुवट आकाश बघे
तळ कोठे पाण्याचा ?
किती दिसाने वाऱ्याला
सूर मिळाला गाण्याचा !

१·९·६४

## तळ नसलेला तळ

सारें आकाश माखून
जाहलेलें रडवेलें,
कासावीस साऱ्या दिशा
रंग भारावून गेले....

अशा भरलेल्या वेळीं
सारें तुडंबून यावें :
कांही मुकें, कांही मुकें
आत खोल पाझरावें....

अशब्दाच्या पैलपार
कोंडलेलें जें काहूर :
धुमाळून यावें असे
क्षण दाटले बाहेर....

परी दगडधोंड्यांची
आज कळा लाभलीशी,
जिद्द दुभंग होण्याची
दुभंगून गेलेलीशी....

काय अर्थ संपलेला
खूण-खूण वेचण्याचा ?
अहेतुक सुरामधे
फिकें बिंब शोधण्याचा ?

मुडपून सूर मारूं
कांही सापडत नाही :
तळ नसलेला तळ
फक्त इतुकेच कांही ?

१९६४

## कंटाळ्याचा शाप

टप्‌टप्‌ ठिबकणारा
हा क्षण....तो क्षण
तो क्षण....हा क्षण :
फत्तराला पडलेलाही
भरून येतो वण,
ओथंबलेले डोळे होती
सुके आपोआप :
उत्कटाला मिळालेला
कंटाळ्याचा शाप!

७.४.६५

## जुना संदर्भ

अर्थाच्याहि पलीकडे गळुनियां संदर्भ गेला जुना
अर्थाहूनहि अर्थगर्भ तरिही ही शून्यता नीरव.
साऱ्या अर्थ हवाचः हट्ट कसला? निःस्वप्न निद्रेंतही
शब्दातीत कृपेंत वाहत असे हा श्वास भारावला.
डोळे भेदुन खोल कातळ फुटे ऐसें इथे काजळ :
त्याही अंधपणात ना कधिकधि डोकावतें चांदणें!
आसक्तींतुन आज मुक्त जरि हा आषाढ पाण्याचिया
स्पर्शातीत असूनियाहि उरला कां स्पर्श गात्रामधे?

१९.९.६५

## वण

संथ जाणत्या नजरेमागे
कधी तुडुंबे काहुरला क्षण :
नितळ वेष्टणामागे असतो
रंग उडाला एखादा वण.

२०.९.६५

## असें तसें

असें तसें किती दिवस :
कंटाळसुरी एकच लय;
साखळलेल्या पाण्यावरती
कुठे कुठे एक वलय.

गिळून टाकला सारा मान,
सारा उपहास, दैन्य सारें;
शल्यें आजचीं कुरवाळतांना
गुलाबाचें स्वप्न रेखलें.

विश्वास होता : एक सकाळीं
कांहीतरी अघटित होईल,
सारे अश्रू सारें दैन्य
एका क्षणांत निपटून घेईल,

व्यथापार करील मला
हळूवार एक हात,
बेसूर सपाट जगण्यावरहि
केंव्हातरी होईल मात.

उद्या उद्या रेषा रेखीत
आज गिळला कांहीबाही;
डोळाभर ज्याचें मोहन
असा उद्या आलाच नाही.

५.७.६६

## संपतांना

संपतांना हवें होतें आर्त संपण्याचें,
देठ तुटतांना हवें भाग्य आक्रांताचें,
वैफल्याची पिळवट व्हावी आंत आंत,
उमटता हुंदकाहि जिरावा मुळांत.
अरुवार पुष्पदळ शहारून यावें
कांहीतरी असेंसुद्धा संपतांना हवें.

डोळियांनी डोळियांना प्यावें डोळाभर,
पानगळ लागलेली दोन्ही गालांवर :
झालें नाही असें कांही; जांभईच एक,
कोलाहल जगण्याचा भरे टाकोटाक;
साचलेल्या पाणियाला कढ जरा आले :
पडसादाविना सारे दबूनिया गेले.

ओढूनियां नेतो आहे काळकामवेग :
कळलेंहि नाही केव्हा ओसरे आवेग

६.७.६६

झुला

श्वासांत श्वास गुंफल्यावर
सुराने सूर पेटल्यावर
उरते अवस्था एकच
तीव्र दारुण दुराव्याची
कळी मिटून घेण्याची :
दोन्हीतही
एक अशब्द गत
एक अनवट घनगर्जित
एक विलक्षण ताण :
एक असलेपणाचा, एक नसलेपणाचा,
एक थरथरता, एक हुरहुरीचा;
मधे कोमट सहानुभूतीचा झुला
झुला—दयेचा झुला
आज मोडून टाकूं दे मला.

१५.७.६६

REFBK-0016309
REFBK-0016309
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०९.० वि: काव्य
क्रमांक १८५३ नों: दि: १५।५।७७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६३०९